केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत संसर्गजन्य आजार कार्यक्रमांसाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत (TSP) सन २०१७-१८मध्ये प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याचा रू.६११.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमएचएम-२०१७/प्र.क्र.५९२/आ-७
१० वा मजला , गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख: ०५ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u>

१) **केंद्र शासनाचे पत्र क्र.NO.G.२५०१२/५/२००९-NRHM Finance,दिनांक १०/०२/२०१४**
२) **शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक १८/०४/२०१७**
३) **केंद्र शासनाचे आदेश क्र.G.२७०३४/३७/२०१७-NHM-F-(E),दिनांक २८ नोव्हेंबर,२०१७**
४) **संचालक,वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान,महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र क्र.राआसोम/एफएमजी/कें.रा.हि/८८७५२-७५९/२०१७-१८,दिनांक ५/१२/२०१७**
५) **शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग,क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.०५/कार्या-०६,दिनांक १९/०१/२०१८**

<u>**प्रस्तावना**</u>

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्रपुरस्कृत योजनांसाठी केंद्र शासनाने उपरोक्त आदेशान्वये संसर्गजन्य आजारांशी संबंधित योजनांसाठी ६०% केंद्र हिश्श्यापोटी आदिवासी उपयोजनेअंतर्गत (TSP)सन २०१७-१८ मध्ये रु.६११.०० लक्ष इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला आहे.सदर निधी आदिवासी विकास विभागाने त्यांच्या संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयान्वये अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरणासाठी उपलब्ध करून दिला आहे.सदर निधी राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता . याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय-

राज्यामध्ये राष्ट्रीय संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत आदिवासी उपयोजने अंतर्गत (TSP) लाभार्थ्यांकरिता सन २०१७-१८ साठी ६०% केंद्र हिश्श्यापोटी प्राप्त झालेला रु.६११.०० लक्ष (रुपये सहा कोटी अकरा लाख फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र.टी-५, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना केंद्र पुरस्कृत योजना अंतर्गत खालीलप्रमाणे नमूद केलेल्या योजना निहाय लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

केंद्र हिस्सा

No.	तपशील	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पीय तरतुद (मूळ व पुरक)	उपलब्ध निधी	मागणी रक्कम (केंद्र हिस्सा)
१	(०१)(१९) सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ६० टक्के)	२२१०F७५६	१७४०.५३	९३०.९५	५०९.००
२	(०१)(२०)राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ६० टक्के)	२२१०F७६५	१३८.०९	८०.८९	४९.००
३	(०१)(२२)राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ६० टक्के)	२२१०F७८३	९९.७१	८१.६२	३५.००
४	(०१)(२१) एकात्मिक रोग सर्वेक्षण प्रकल्प केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ६० टक्के)	२२१०F७७४	२८.३७	२८.३७	१८.००
		एकुण	२००६.७०	११२१.८३	६११.००

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्राकरीता (TSP)उपलब्ध करून दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्याकरीता व आदिवासी क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी.तसेच

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर (OTSP) केलेली तरतुद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरीताच खर्च करण्यात यावी.

५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५०२ /अर्थोपाय, दिनांक १९/१२/२०१७ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०५११४४४२२०१७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=36b60751d094e56d974e1a44ec234c475fb0de5b35a79c1cf69a588f212b260e, serialNumber=bb4888cebbf4b7a6440c6531a52925e3c8140b1c28df723d8f006d11bc169a08, cn=Amol Nilakanth Sakharkar
Date: 2018.02.05 16:22:26 +05'30'

(अ.नि.साखरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
५. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
६. सहायक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
७. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

१०.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

११. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.

१२. अवर सचिव,आदिवासी विभाग यांना त्यांच्या शासन निर्णय,क्र.बीयुडी-२०१७ /प्र.क्र.०५/कार्या ०६,दिनांक १९/०१/२०१८ संदर्भात माहीतीसाठी अग्रेषित.

१३.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई .

१४.निवडनस्ती (आरोग्य -७) .